सोमवार दि.९ सप्टेंबर २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : ३७३
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in


# मी मुख्यमंत्री होईल अशी उद्धव ठाकरेंना भीती होती:रामदास कदम यांचा गौप्यस्फोट

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

शिंदे गटाचे नेते रामदास कदम यांनी मोठा गौप्यस्फोट केला आहे. मी मुख्यमंत्री होईल याची उद्धव ठाकरे यांना भीती होती. त्यामुळेच त्यांनी मी मागीतलेला मतदारसंघ दिला नाही आणि मला दूसरा मतदारसंघ देऊन पाडले, असे खळबळजनक विधान त्यांनी केले आहे. पत्रकारांशी संवाद साधताना रामदास कदम यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार हल्लाबोल चढवला आहे. रामदास कदम म्हणाले, उद्धव ठाकरे यांनी माझ्यासहीत नारायण राणे आणि एकनाथ शिंदे यांनाही मुख्यमंत्री होऊ नये म्हणून कारवाया केल्या होत्या. बाळासाहेब ठाकरे मला मुख्यमंत्री बनवतील अशी भीती उद्धव ठाकरे यांना होती. म्हणून उद्धव ठाकरेंनी मला मुद्दाम गुहागरला निवडणुकीसाठी उभे केले आणि पाडले. मी दापोली मतदारसंघ मागितला होता. मात्र काही नेत्यांना सांगून राजकारण करत मला पाडले. उद्धव ठाकरे यांच्या या राक्षसी महत्त्वकांक्षेमुळेच आज शिवसेना फुटली आहे, असा थेट आरोप रामदास कदम यांनी केला आहे.

रामदास कदम पुढे म्हणाले, विरोधी पक्षनेतेपदाची जबाबदारी मला देण्यात आली होती. पण मी विरोधी पक्षनेता व्हावा हे उद्धव ठाकरे यांच्या मनात नव्हते. त्यामुळेच त्यांनी मला शेवटपर्यंत पत्र देणार नाही, अशीच भूमिका घेतली होती. गजानन कीर्तिकर या गोष्टीला साक्षीदार आहेत. त्यावले मनोहर जोशी देखील उपस्थित होते. अखेर बाळासाहेबांनी सांगितल्यावर मला विरोधी पक्षनेते पदाच्या नियुक्तीचे पत्र दिले गेले. एखादे खाते द्यायचे आणि बाजूला बसवायचे हे उद्धव ठाकरे यांचे धोरण असल्याचा आरोप कदम यांनी केला आहे.रामदास कदम म्हणाले, नारायण राणे दुसऱ्या पक्षात गेल्यावर बाळासाहेब मला त्यांच्या गाडीत घेऊन जायचे. एकदा राहुल बजाज बसले होते. तेव्हा बाळासाहेबांनी त्यांना सांगितलं की, इसको पहचानते हो ये कौन है? राज ठाकरे और नारायण राणे जाने के बाद इसीने मेरी शिवसेना बचायी है. ते बाळासाहेब कुठे आणि उद्धव ठाकरे कुठे? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.बाळसाहेब ठाकरे यांचे पुत्र म्हणून उद्धव ठाकरे यांना आयती गादी मिळाली आहे. त्यांनी केसेस अंगावर घेतल्या नाहीत. आयत्या बिळावर नागोबा झाले. त्यांनी नेहमीच मराठी माणसात फूट पाडण्याचा प्रयत्न केला आहे. आज ते काँग्रेसचे पाय चाटत आहेत. आम्ही तर बाळसाहेबांचे विचार पुढे घेऊन जात आहोत. शरद पवारांना अख्खा महाराष्ट्र ओळखतो. पवार उद्धव ठाकरेंना कोणत्या कोपऱ्यात टाकतील हे त्यांना कळणारही नाही, अशी टीका कदम यांनी केली.





# स्वामी चिंचोलीच्या शेख कुटुंबासाठी दौंड चे आमदार ठरले आरोग्य दूत

## आमदार कुल यांनी नऊ लाख रुपयांचा उपचार केला मोफत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

दौंड । बबनराव धायतोंडे



स्वामी चिंचोली ता.दौंड येथील अब्बास जैनुद्दीन शेख यांना मानेचा,पाठीचा आणि मणक्याचा आजार होता.या आजाराने शेख अतिशय त्रस्त झाले होते.अनेक वर्षापासून ते या आजाराच्या त्रासामुळे चालू,फिरू शकत नव्हते.त्यांना अतिशय वेदना होत होत्या.उठण्यासाठी आणि बसण्यासाठी त्यांना अतिशय त्रास होत होता.

त्यांच्या मदतीला धावून आले ते शेख वस्ती स्वामी चिंचोली येथील माजी सरपंच अझरभाई शेख हे त्यांना दौंड तालुक्याचे आमदार राहुल कुल यांच्याकडे घेऊन गेले,आणि शेख याचे उपचारासाठी विनंती केली,त्यावर लागलीच आमदार राहुल कुल यांची शेख यांच्या ऑपरेशनसाठी आरोग्य यंत्रणा कामाला लागली, नानावटी हॉस्पिटल मुंबई या ठिकाणी शस्त्रक्रिया करण्यासाठी हालचाली सुरु झाल्या आणि त्यांचे नानावटी हॉस्पिटल मुंबई येथे ऑपरेशन अगदी मोफत करून दिले.

संपूर्ण शस्त्रक्रिया योग्य आणि मोफत झाल्यानंतर अब्बास शेख आज ठणठणीत झाले,असून ते रविवार दि. ८ सप्टेंबर रोजी आमदार राहुल कुल यांचे आभार मानण्यासाठी राहू येथे निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतली.आणि आमदार राहुल कुल यांचे आभार मानले व ऋण व्यक्त केले. त्यांच्या सोबत स्वामी चिंचोलीचे माजी सरपंच अझरभाई शेख आणि बाबासाहेब शेळके,यासीन शेख,पिंटू शेख व इतर ग्रामस्थ उपस्थित होते.

# इंदापूर मध्ये शरद पवार आणि हर्षवर्धन पाटील यांच्या एकत्र बॅनरची चर्चा

## इंदापूर मध्ये राजकीय चर्चांना आले उधान!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क


इंदापूर । बबनराव धायतोंडे

दररोज संपूर्ण महाराष्ट्रभर चर्चा होत असलेला इंदापूर विधानसभा मतदारसंघ आणि हर्षवर्धन पाटील यांची विधानसभेला नेमकी भूमिका काय? असणार,तसेच संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिलेल्या इंदापूर विधानसभेला इंदापूर तालुक्यात लवकरच राजकीय भूकंप होण्याच्या मार्गावर आहे ?असे चिन्ह एकंदरीत दिसत असताना शहरातील शरदचंद्र पवार आणि माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांचे एकत्र बॅनर इंदापूर शहरात लागले आहेत.

इंदापूर तालुक्यातील जनतेची झाली तयारी हर्षवर्धन भाऊ आता तुम्ही वाजवा तुतारी, असे या बॅनर वरती लिहिले आहे.आणि लवकरच हर्षवर्धन भाऊ तुतारी हातात घेणार का ? ते स्पष्ट होईलच पण सध्या इंदापूर शहरातील याच लागलेल्या बॅनरची चर्चा सर्वत्र चालू असलेली पाहायला मिळत आहे.परंतु येणारा काळच ठरवेल हर्षवर्धन पाटील नेमकी काय भूमिका घेणार.




माजी.मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी



२०२४ च्या विधानसभेची निवडणूक ही कोणत्याही चिंन्हावर लढवली तरी त्यांचा विजय निश्चित आहे.आणि आमची निवडणुकीची संपूर्ण तयारी झाली असून हर्षवर्धन भाऊंना विजयाचा मानाचा फेटा घालण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत.

–संपतराव बंडगर
प्रसिद्ध युवा उद्योजक
भिगवण ता. इंदापूर.

# श्री गंगाधरजी देशमुख यांना दीपस्तंभ पुरस्कार प्रदान



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

बीड । प्रतिनिधी

बीड येथील शक्ती प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेद्वारा दरवर्षी विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना पुरस्काराने सन्मानित केले जाते. शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा घेऊन त्यांना बक्षीस देऊन प्रोत्साहित केले जाते तसेच जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या शिक्षकांची निवड करून ५ सप्टेंबर ,शिक्षक दिनाच्या निमित्ताने आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते. त्याचबरोबर सामाजिक क्षेत्रात वेगवेगळ्या विषयावर कार्य करणाऱ्या व्यक्तींना दीपस्तंभ पुरस्कार प्रदान करण्यात येतात.

कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार द्वारा दीनदयाल शोध संस्थान संचलित जन शिक्षण संस्थानच्या माध्यमातून बीड जिल्ह्यात युवक युवतींना कौशल्य विषयक प्रशिक्षण देऊन स्वावलंबी होण्यासाठी प्रेरित केले जाते. या विशेष कार्याची दखल घेऊन शक्ती प्रतिष्ठान बीड या संस्थेने संचालक श्री गंगाधरजी देशमुख यांना दीपस्तंभ हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

दिनांक ८ सप्टेंबर २०२४ रोजी पुरस्कार प्रदान सोहळा प्रसंगी बीड येथील पोलीस इन्स्पेक्टर श्री दिगंबर बोल्डे, शिक्षण अधिकारी श्री विक्रम सारूक, सेवानिवृत्त मुख्याध्यापिका श्रीमती सुनंदाताई कुलकर्णी, डॉ. सीमाताई जोशी, शक्ती प्रतिष्ठानचे श्री केंडे सर, यांची उपस्थिती होती.

# समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी देऊळ-गावराजा येथे शिक्षक दिन उत्साहात

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

देऊळगाव राजा । प्रतिनिधी




समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी देऊळगाव राजा येथे दि.०५/०९/२०२४ रोजी राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे आयोजित डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. प्रफुल्ल ताठे यांच्या हस्ते डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. डॉ. गोपाळकृष्ण सीताफळे, डॉ. पुरुषोत्तम लड्डा, प्रा. किशोर चराटे डॉ. दिनेश घुबे.रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रो. योगेश जाधव, रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी प्रो. शितल रघुवंशी, रा.से यो. विभागाच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा करताना ऊपस्थित शिक्षकांना गुलाब पुष्प देऊन त्यांचे आशिर्वाद घेतले.

शिक्षक हा केवळ ज्ञानदानाच कार्य करत नसुन विद्यार्थ्यांवर संस्कार करून ज्ञानी विद्यार्थ्यां बरोबरच संस्कारी विद्यार्थी सुध्दा घडविण्याचे काम करतो. शिक्षण घेण्याची इच्छा असलेला विद्यार्थी नसेल तर शिक्षकाच्या शिकवण्याचे काहीही चीज होणार नाही असे सांगताना शिक्षकासाठी ज्ञान घेण्याची आस असलेला विद्यार्थी किती महत्वाचा आहे याकडे महाविद्यालयाचे प्रा. डॉ. गोपाळकृष्ण सीताफळे यांनी विद्यार्थ्यांचेलक्ष वेधले. प्रा. अमोल गिरी, प्रा. वाय बी उबरहंडे.प्रा.प्रा. तन्मय डोणगावकर, प्रा. पवन नारखेडे प्रा. एस व्ही कोल्हे, प्रा. एस उगले, प्रा. उमेश पिंपळे, प्रा. एन पंडित, प्रा. एम. जी. चित्ते, प्रा. के व्ही सानप.प्रा. जी जे जोगडे, प्रा. आर एम अल्हाट प्रा.ओ एस खार्डे, तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व रासेयो स्वयंसेवक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री गणेश विद्यालय आष्टी चे जिल्हास्तरीय डॉजबॉल स्पर्धेत

# संघाची विभागीय स्तरावर निवड झाल्याबद्दल संचालक थेटे यांनी केले विद्यार्थ्यांचे अभिनंदन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । अण्णासाहेब साबळे



५ सप्टेंबर २०२४ रोजी क्रीडा व युवक सेवा संचालनाकडून घेण्यात येणाऱ्या जिल्हास्तरीय डॉजबॉल स्पर्धा आष्टी येथे पार पडल्या.त्यामध्ये श्री गणेश विद्यालय आष्टीचे मुले व मुली १७ वर्षे वयोगट सहभागी झाले होते.मुलींच्या संघाने जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवला तर मुलांच्या संघ उपविजेता ठरला.मुलांच्या या यशाबद्दल श्रीमती सुमनबाई थेटे अध्यक्षा श्री गणेश शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी श्री पोपटराव खाडे सचिव, श्री भाऊसाहेब कोकणे श्री मधुकरराव वांढरे,श्री महेशशेठ सावंत,श्री राजकुमार थेटे संस्थेचे संचालक तथा मुख्याध्यापक रमेशसिंह देसुरकर,संचालक जोतिराम कोकणे,श्री.रविकांत तरटे व संस्थेचे सर्व संचालक, पर्यवेक्षक अशोक गाडेकर क्रीडा शिक्षिका स्वाती चौधरी,श्री पोपटराव घुले,संजयकुमार थेटे,शिक्षक वृंद व यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



झाडे लावा झाडे जगवा

## चारोळी

गणराया तुमच्या आगमनाने
सदनही नाचू लागले
एकच घोष घुमू लागे
विसरूनी सारे भेद मागले.

रंजना सानप
मायणी (सातारा)

# देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री व्हावेत:चित्रा वाघ यांनी घातले गणरायाकडे साकडे

लोकनेता न्यूज नेटवर्क । मुंबई (वृत्तसंस्था)

भाजप नेत्या चित्रा वाघ यांच्या घरी गणपती बाप्पाचे आगमन झाल्यावर देवेंद्र फडणवीस पुन्हा मुख्यमंत्री व्हावेत, असे साकडे घातले आहे. त्यांच्या या इच्छेमुळे आता पुन्हा एकदा महायुतीमध्ये अंतर्गत वाद असल्याचे दिसत आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्राने प्रगतीमध्ये एक नंबर गाठला आहे, असे चित्रा वाघ म्हणाल्या.चित्रा वाघ यांच्या घरी गणपती बाप्पा यांचे आगमन झाल्यावर त्या बोलत होत्या.

# गावठाण फिटरचे घोडे अडले की अडवले? दोन पोल रोवून ठेकेदार फरार ग्रामस्थांत संताप





> वालसावंगी गावठाण सोबत सुंदरवाडी येथील गावठाणचे काम अजून झाले नसून ठेकेदार का काम करत नाही हे कळेना झाले आहे.वीज विभागाकडून देखील काहीच हालचाल होत नाही.वीज विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देण्याची गरज आहे.
> –फकिरा गवळी,सुंदरवाडी.

> शिवसेनेच्या आंदोलनामुळे वालसावंगी येथील गावठाण फिटरचे साहित्य आले होते शिवाय काम देखील सुरू झाले होते मात्र केवळ २ पोल रोवून काम थांबले असून काम पुन्हा सुरू करण्यासाठी शिवसेनेच्या वतीने पुन्हा एकदा २० तारखेला तीव्र आंदोलन करण्यात येणार आहे.
> – मानिषभैया श्रीवास्तव,शिवसेना उपजिल्हाप्रमुख, जालना ठाकरे गट.

■ लोकनेता न्यूज नेटवर्क


**वालसावंगी । कौतिक हिवाळे**

अनेक महिन्यापासून येथे गावठाण फिटरला मंजुरी मिळाली होती मात्र काम काही सुरू होत नव्हते तेव्हा शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने उपजिल्हाप्रमुख मानिषभैया श्रीवास्तव यांच्या नेतृत्वाखाली वालसावंगी फाट्यावर रास्तारोको आंदोलन करण्यात आले होते.गावठाण फिटरचे काम तात्काळ सुरू करावे ही प्रमुख मागणी होती यावेळी वीज विभागाचे अभियंता यांनी लेखी पत्र दिले होते त्यामध्ये काम सुरू करण्याची हमी दिली होती.त्याच आंदोलनाचा परिणाम म्हणून दुसऱ्याच दिवशी गावठाण फिटरसाठी आवश्यक असलेले लोखंडी पोल, अन्य साहित्य गावात आणण्यात आले होते. त्यामुळे ग्रामस्थांत आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. अगदी दुसऱ्या दिवशी कामाला देखील सुरुवात करण्यात आली होती.दोन पोल देखील रोवण्यात आले होते. मात्र ते दोन पोल रोवून संबंधित ठेकेदार मजूर फरार झाले ते आजपर्यंत फरारच आहे.महिना उलटत आला काम मात्र सुरू झाले नसल्याने काम नेमके का थांबवले.?गावठाण फिटरचे घोडे अडले की अडवले?कुणी काम थांबवायला सांगितले का.?असे अनेक प्रश्न ग्रामस्थांन पडले असून ग्रामस्थांत संताप व्यक्त होत आहे. वास्तविक पाहता गावठाण फिटरचे काम महिनाभरात होणे अपेक्षित होते मात्र काम सुरूच झाले नसून पोल व साहित्य जागीच पडून असून काम सुरू होण्याचा मुहूर्त कधी सुरू होणार हे मात्र निश्चित नाही. दरम्यान तातडीने हे काम पूर्ण करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

**यासाठी गावठाणची गरज:**बऱ्याच वेळा शेतातील रोहित्रात बिघाड झाल्याने गावातील वीज सुद्धा बंद केली जाते काही दिवसांपूर्वी शेतातील रोहित्रात बिघाड झाल्याने रात्रभर गाव अंधारात होते.गावठाण फिटर झाल्याने शेतातील व गावातील वीज वेगवेगळी होणार असून म्हणजे शेतातील रोहित्रात बिघाड झाल्यास गाव बंद राहणार नाही.वीजपुरवठा सुरळीत राहील.

**वीज विभागाचा असहयोग.:**गावठाण फिटरचे काम सुरू झाले असताना वीज कर्मचारी यांनी सहकार्य केले नाही.धावडा येथील कनिष्ठ अभियंता यांनी देखील याकडे लक्ष दिले नाही.वास्तविक पाहता गावठाण फिटर झाल्याने विजेचा प्रश्न सुटणार असल्याने गावातील वीज कर्मचारी यांनी सहकार्य करणे अपेक्षित होते मात्र त्यांनी सहकार्य केले नाही पोल रोवण्यात मार्गदर्शन केले नसल्याचा प्रकार सुद्धा घडला आहे..

**पुन्हा रास्तारोको आंदोलन:**दरम्यान येथील गावठाण फिटरचे काम सुरू करण्यात यावे या मागणीसाठी पुन्हा एकदा शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने येत्या २० तारखेला अजिंठा बुलढाणा महामार्गावर रास्तारोको आंदोलन करण्यात येणार आहे.



जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक लोकनेता

Reg No - MAHMAR52676

मुख्य संपादक :- ज्ञानेश्वर सुरेश बुधवत

दिनांक :29/05/2024

प्रति,

पत्रकार, लेखक, वाचक

विषय :- गाव, तालुका, जिल्हा पातळीवर प्रतिनिधी (पत्रकार)नेमण्या बाबत;

**सर्वांना साष्टांग नमस्कार...** भरकटत जाणाऱ्या तरुण पिढीने आज कुठे तरी विकासावर बोललं पाहिजे या गोष्टीचा विचार करून गावोगाव एक पत्रकार अशा मोहिमेला आम्ही सुरुवात करत आहोत. गावातील सखोल गोष्टींचा अभ्यास करून घडणाऱ्या विपरीत गोष्टी या जगा समोर आल्याचं पाहिजे, याचसाठी नवं तरुणांना पत्रकार होऊन आपली एकनवी ओळख निर्माण करण्याची संधी आम्ही देत आहोत.

आपल्या भागातील नवं तरुणांना आमच्या पर्यंत जोडून देण्याचे काम आपण सर्वांनी करावे. अन्यायाला वाचा फोडता आलीच पाहिजे आणि ते आपण सर्वांना सोबत घेऊन करण्याचे ठरवले आहे.

अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे. अनुभवी व्यक्तींना प्राधान्य तर विनाअनुभवी लोकांना संधी देण्याचे काम दैनिक लोकनेता करत आहे...

**तरी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा...!**

संपर्क - ज्ञानेश्वर बुधवत मुख्यसंपादक मो. न. - 9960209149

ज्ञानेश्वर मुंढे संपादक मो. न. - 7499615933

संपादक
मुख्यसंपादक
ज्ञानेश्वर सुरेश बुधवत
मातृतिर्थ,सिंदखेडराजा 9960209149

मुख्य कार्यालय :- सिंदखेड राजा जि.बुलडाणा 443203
मो.नं.8459977904 · E-mail - elokneta@gmail.com

# पुण्यात अमली पदार्थ विरोधी विभागाची कारवाई कोंढव्यातून ४० लाखांचे मेफेड्रोन, पिस्तूल जप्त

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पुणे (वृत्तसंस्था)**

पुणे शहरात गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी अमली पदार्थ विक्रेत्यांवर करडी नजर ठेवली आहे. अमली पदार्थ विरोधी पथकाने कोंढव्यात छापा टाकून ४० लाख रुपयांचे मेफेड्रोन आणि देशी बनावटीचे पिस्तूल जप्त केले.

कोंढव्यातील भाग्योदयनगर परिसरात समीर शरीफ शेख (वय २२, रा. सय्यद काझी हाईट्स, कोंढवा) याच्याकडे मेफेड्रोन असल्याची माहिती गस्त घालणारे अमली पदार्थ विरोधी पथक एकचे पोलिस निरीक्षक उल्हास कदम यांना मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने शेख याच्या घरावर छापा टाकला. पोलिसांच्या पथकाने शेखच्या घरातून ४० लाख रुपयांचे २०२ ग्रॅम मेफेड्रोन, देशी बनावटीचे पिस्तूल,



मोबाइल संच असा ४२ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

अतिरिक्त आयुक्त शैलेश बलकवडे, उपायुक्त निखिल पिंगळे, सहायक आयुक्त गणेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक उल्हास कदम, उपनिरीक्षक दिगंबर कोकाटे, संदीप शिर्के, प्रवीण उत्तेकर, संदेश काकडे, दयानंद तेलंगे पाटील, विपूल गायकवाड, योगेश मोहिते, रेहाना शेख यांनी ही कारवाई केली.

बिबवेवाडी भागातील चैत्रबन सोसायटी परिसरात गांजा विक्रीसाठी आलेल्या तरुणाला अमली पदार्थ विरोधी पथकाने पकडले. आयुष अनंत शिंदे (वय २०, रा. शनीमंदिरामागे, बिबवेवाडी) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. त्याच्याकडून ५३० ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला. नगर रस्त्यावर गांजा विक्रीसाठी आलेल्या आकाश राजू घोरपडे (वय २३, रा. दत्त मंदिराजवळ, खुळेवाडी, विमानानगर) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून ७०५ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला. घोरपडेचा साथीदार धनंजय दशरथ पवार याला अटक करण्यात आली. दोघांविरुद्ध विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. अमली पदार्थ विरोधी पथकाचे (दोन) वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुदर्शन गायकवाड आणि पथकाने ही कारवाई केली.

# राज्यात फॅशन शो सुरू आहे काय? विजय वडेट्टीवार यांचा संताप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

सध्या राज्यात महायुती सरकारचे इव्हेंट सुरू आहेत. मुख्यमंत्री व त्यांचे दोन्ही उपमुख्यमंत्री १०० फुटांच्या रॅम्पवर चालतात. राज्यात फॅशन शो सुरू आहे का? असा सवाल राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी शनिवारी लाडकी बहीण योजनेच्या कार्यक्रमांवरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारवर निशाणा साधताना हाणला.

महायुती सरकारने आपल्या महत्त्वकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या प्रचारासाठी राज्यभरात कार्यक्रमांचा धडाका लावला आहे. विजय वडेट्टीवार यांनी त्यांच्या या कार्यक्रमावरून सरकारला खडेबोल सुनावलेत. ते म्हणाले की, महायुती सरकारचे 'इव्हेंट' चाललेत. ते १०० फुटाचा रॅम्प करतात. त्यावर मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री रॅम्पवॉक करतात. फॅशन-शो आहे काय? लाडकी बहीण म्हणून महिलांचा कार्यक्रम घेताना. हे लोक फॅशन-शो करायला निघालेत. इव्हेंट करायला निघालेत, तिजोरी साफ करायला निघालेत.विजय वडेट्टीवार पुढे म्हणाले, महाराष्ट्रात एवढे दारिद्र्य व भ्रष्टाचारी सरकार केव्हाच आले नव्हते. तापाने फणफणलेल्या मुलांना वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे गडचिरोलीत दोन मुलांना आपला जीव गमवावा लागला. रस्ते आणि रुग्णवाहिका नसल्याने, या मुलांचे मृतदेह आईवडिलांनी खांद्यावर घेऊन आरोग्य केंद्रापर्यंत १५ किलोमीटर पायपीट केली. पण त्याचे या सरकारला कोणतेही सोयरसूतक नाही. या प्रकरणी वडेट्टीवार यांनी गडचिरोलीचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस तथा अन्न व औषध मंत्री मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांनाही धारेवर धरले.

# १२ सप्टेंबर रोजी लोह्यात शिवसेनेची तोफ धडकणार खा.संजय राऊत यांची सभा सर्वांचे लक्ष वेधणार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाची मुलुख मैदानी तोफ फायर ब्रॅण्ड नेते खा. संजय राऊत यांची दि. १२ सप्टेंबर रोजी लोहा शहरात सभा होणार असून त्यांची सभा लोहा -कंधार मतदार संघातील जनतेने लक्ष वेधणार आहे.

याबाबत अधिक माहिती शिवसेना उबाठा पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश संघटक तथा लोहा -कंधार मतदार संघाचे शिवसेना महाविकास आघाडीचे संभाव्य उमेदवार म्हणून संबोधले जाणारे एकनाथ दादा पवार यांनी याबाबत लोहा येथे त्यांच्या कार्यालयात पत्रकार परिषद घेऊन माहिती सांगितली.

पुढे बोलताना शिवसेनेचे महाराष्ट्र प्रदेश संघटक एकनाथ दादा पवार यांनी सांगितले की, शिवसेनेची मुलुख



मैदानी तोफ शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांची दि.१२ सप्टेंबर रोजी लोहा शहरातील मुख्य रस्त्यावर असलेल्या राधाई मंगल कार्यालय येथे सकाळी १० वाजता शिव संवाद मेळाव्याला प्रमुख मार्गदर्शन करणार असुन यावेळी शिवसेनेचे विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते आ.आंबादास दानवे, नांदेड जिल्हा संपर्कप्रमुख बबनराव थोरात आदी उपस्थित राहणार आहेत.

शिवसेना नेते खा. संजय राऊत यांच्या सभेसाठी शिवसेना पक्षाच्या वतीने जय्यत तयारी केली असुन यासाठी विविध समित्या स्थापन केल्या आहेत.

शिवसेना नेते संजय राऊत यांची पहिल्यांदाच लोहा शहरात जाहीर सभा होणार असल्यामुळे या सभेबदल सर्वत्र निर्माण झाली आहे. शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांची सभा यशस्वी होण्यासाठी लोहा - कंधार विधानसभा मतदारसंघातील शिवसैनिक अहोरात्र परिश्रम घेत आहेत असे शिवसेना उबाठा चे महाराष्ट्र प्रदेश संघटक एकनाथ दादा पवार यांनी सांगितले.

तसेच दि.१२ सप्टेंबर २०२४ रोजी शिवसेनेचे संभाव्य उमेदवार एकनाथ दादा पवार यांच्या मध्यवर्ती निवडणूक कार्यालयांचे उद्घाटन शिवसेना नेते खासदार संजय राऊत व शिवसेनेचे विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे या मान्यवरांच्या हस्ते होणार आहे.

यावेळी शिवसेनेचे लोहा -कंधार विधानसभा प्रमुख भाऊसाहेब पाटील कदम, सुप्रसिद्ध निवेदक विक्रम कदम सर, माजी जिल्हा परिषद सदस्य बालाजी भैय्या परदेशी,लोहा तालुकाप्रमुख संजय ढाले, शिवसेनेचे लोहा शहरप्रमुख खंडू पाटील पवार, कंधार तालुकाप्रमुख सचिन पेटकर, युवासेनेचे लोहा अधिकारी गजानन पाटील मोरे, सरपंच रामेश्वर पाटील पवार, रुद्रा पाटील भोस्कर, आदी उपस्थित होते.

# आष्टी मधील श्री.नाईक सरांच्या ज्ञानश्री सायन्स क्लासेस मध्ये गणेश मूर्तीचे थाटात आगमन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

भाद्रपद मासात तुम्हा-आम्हा सर्वाच्या लाडक्या गणरायाचं आगमन होत असलं तरी त्याच्या आगमनाची सर्वजण आतुरतेने आधीपासूनच वाट पाहत असतात.घरगुती गणपती असो की सार्वजनिक,किंवा क्लासमधील सर्वजण एकजुटीने त्याच्या स्वागताची जय्यत तयारी करतात.त्यामुळे घरीदारी आनंदाचं,उत्साहाचं,प्रेमाचं वातावरण आपोआप तयार होतं आणि त्यामुळे सर्वजण एकत्र येतात.परिणामी सर्वत्र सकारात्मक ऊर्जा अनुभवता येते.आपल्या सण-उत्सवांचे हे वैशिष्ट्य़ आहे की त्या निमित्ताने नाती दृढ व्हावीत आणि भेदभाव गळून पडावेत.अशी व्यापक विचारधारा घेऊन येणारे

आष्टी मधील ज्ञानश्री सायन्स क्लासेस जाणीवपूर्वक



क्लासेसमध्ये गणेशोत्सवाचा उपक्रम राबवत आहेत आणि विद्यार्थ्यांना घडवण्याचा प्रयत्न करीत आहेत.विशेषत्वाने उल्लेख करण्याजोगी बाब म्हणजे मागील आठ दिवसांपासून क्लासेस मधील लहान मोठे सर्व विद्यार्थी गणेश आगमनासाठी तयारी करत होते. गणेशपूजन हे निसर्गाशी नाते सांगणारे असेच आहे.या सर्व विद्यार्थ्यांना गणेश मूर्तीच महत्त्व, गणपतीची सजावट,पूजेची तयारी,नैवेद्य इ.विषयीची माहिती सांगितली जाते.क्लासमध्ये आणलेली गणेशाची सुंदर प्रतिमा,मोदक,जास्वदींची फुले, गणपतीसाठी बनवलेली सजावट चटकन लक्ष वेधून घेते.लहान वयात केलेले संस्कार मुलांवरती कायमस्वरूपी ठसा उमटवतात आणि त्यांच्या जडणघडणीत महत्त्वपूर्ण योगदान देतात. त्यामुळे अशा तऱ्हेचा उपक्रम स्तुत्य आणि अनुकरणीय आहे. आष्टी मधील ज्ञानश्री क्लासेस मध्ये श्री.नाईक सर यांच्या मार्गदर्शनातून क्लासमध्ये गणेशमूर्तीची स्थापना केली जाते.मागील तीन वर्षापासून त्यांच्या क्लास मध्ये ही परंपरा जोपासली जाते.या उत्सवांमध्ये विद्यार्थ्यांना आवर्जून सामावून घेतले जाते.गणेशचतुर्थीच्या दिवशी पारंपरिक पद्धतीने गणेशाचे आगमन होते.खरं तर तो एक सुंदर आणि संस्मरणीय अनुभव असतो.क्लासमध्ये विद्यार्थ्यांतर्फे गणपतीची यथासांग पूजा केली जाते,आरत्या म्हटल्या जातात.

सकाळ,संध्याकाळ आरती, प्रसाद अशी व्यवस्था केली जाते. सर्व विद्यार्थी आणि शिक्षक या उत्सवाची तयारी करतात आणि एकदिलाने,एकजुटीने उत्साहाने उत्सव साजरा करतात.

# वासुंदे येथील खडी क्रेशर वाहतूक मालकांनी आरटीओंच्या डोळ्यावर बांधले नोटांचे बंडल

## दररोज १००० ते १२०० ओव्हरलोड गाड्यांची वाहतूक करून शासनाला लावतात चूना

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

वासुंदे ता.दौंड येथील खडी क्रेशर वरून कच,डस्ट,खडी ईत्यादी अंदाजे हजार ते बाराशे हायवा लहान-मोठ्या गाड्या भरून इतर ठिकाणी वाहतूक होत आहे.परंतु बारामती येथील उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांना एवढ्या मोठ्या प्रमाणात होणारी वाहतूक का दिसत नाही.







ही मोठी शोकांतिका आहे,उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या ऑफिस मधील काही अधिकारी दौंड,इंदापूर येथील काही रोडवर कारवाई करताना दिसत आहेत,एखाद-दुसरी कारवाई ही रोडला केलेली पाहायला मिळते.परंतु वासुंदे येथे एवढ्या मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असलेल्या ओहरलोड हायवा गाड्या त्यांना का?दिसत नाहीत.अशी चर्चा ग्रामस्थांमध्ये आणि ईतर वाहन चालक-मालकांमध्ये चालू आहे.वासुंदे येथील खडी क्रेशर वरून जडवाहतूक करणाऱ्या सर्व गाड्यांचे तिन हजार रुपयांचे कार्ड संबंधित अधिकाऱ्यांना प्रत्येक महिन्याला मिळते,अशी येथील वाहन चालकांमध्ये जोरात चर्चा आहे,त्यामुळे खडी क्रेशर वरून एवढ्या मोठ्या प्रमाणात जड वाहतुक करणाऱ्या गाड्यांवर कारवाई केली जात नाही.असे येथीलच खडी वाहतुक करणाऱ्या एका ड्रायव्हरने नाव न छापन्याच्या अटींवर सांगितले आहे.

मग वासुंदे येथील काळे सोने घेऊन जाणारे जड वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कशी कारवाई होणार,हा देखील संपूर्ण पुणे जिल्ह्यातील जनतेला पडलेला मोठा प्रश्न आहे.एवढ्या मोठ्या प्रमाणात शासनाला चुना लावून लूट करणाऱ्या खडी क्रेशर मालकांवर आणि वाहतूकदार यांच्या वरती काय कारवाई होणार याची फक्त वाटच पाहवी लागेल,हे मात्र नक्की.

## श्री लक्ष्मीकांत खोडके यांची ग्रामसेवक सेवेमधून


# निवृत्त झाल्याबद्दल गावकऱ्यांच्या वतीने सत्कार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

सेनगाव तालुक्यातील वलाना ग्रामपंचायत कार्यालय येथे डॉ देवानंद शंकर गोरे सरपंच तथा सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्र चे जिल्हा समन्वयक यांच्या प्रमुख उपस्थितीत माननीय श्री लक्ष्मीकांत खोडके साहेब यांच्या सेवे मधून निवृत्त झाल्याबद्दल त्यांचा सत्कार ठेवण्यात आला होता

माननीय खोडके साहेब यांची ग्रामसेवक या पदावर असतांना मागील सोळा २००२ पासून ते २०१८ एवढी प्रशासकीय सेवा वलाना गावाला लाभली त्या बद्दल समस्त गावकरी व गावातील पदाधीकारी तसेच मा सरपंच, उपसरपंच,ग्रामसेवक श्री. मुळे साहेब,सदस्य, मा. सभापती, ग्रामपंचायत कर्मचारी यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये



सेवा निवृत्ती चा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाच्या वेळी बोलत असतांना वलाना गावातून मिळालेल्या प्रेमामुळे आम्हांला खुप काही प्राप्त झाले व सर्वच गावे या गावाप्रमाणे प्रेम देणारी असावी असे एकदम भावनिक स्वरूपात त्यांनी कथन केले. सर्व गावकरी मंडळी नी साहेबांचा सत्कार केला. वलाना गावाकऱ्यांनी साहेबांना पुढील भावी आयुष्यासाठी खुप खुप शुभेच्छा दिल्या व असेच आपले मार्गदर्शन शेवट पर्यंत राहील अशी गावाकऱ्यांनी इच्छा व्यक्त केली.

# रांजणगावात ३६ वर्षानंतर एकत्र येऊन जपले ४६ वर्षांचे मित्र संबंध

## पंडित खेडकर यांची उप आयुक्त विक्रीकर विभाग पदी पदोन्नती

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती । प्रतिनिधी**

रांजणगाव गणपती ता. शिरुर येथील १९८८ च्या दहावीच्या बॅचने ७ सप्टेंबर या दिवशी एकत्र येत आपल्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. निमित्त होते या बॅचमधील श्री. पंडित खेडकर उप आयुक्त विक्रीकर विभाग यांच्या पदोन्नतीचे. महागणपती इंग्लिश मीडियम रांजणगाव गणपती येथे हा छोटेखानी सत्कार समारंभ कार्यक्रम संपन्न झाला. यामध्ये १९८८ साली शालांत परीक्षेत प्रविष्ट झालेले सर्व विद्यार्थी उपस्थित होते. यामध्ये सर्व जणांनी आपले अनुभव कथन करून आपल्या वर्गमित्रांना शुभेच्छा दिल्या. विवीध क्षेत्रामध्ये काम करणारी माणसं जेंव्हा एकत्र येतात तेंव्हा खरी विचारांची देवाण-घेवाण होत असते.विशेष करून श्री पंडित खेडकर यांना म.फुले पगडी देऊन सन्मान करण्यात आला.



सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. एक फार मोठी ऊर्जा प्रत्येकाला या कार्यक्रमातून मिळाली. सर्वांनी सामाजिक बांधिलकी समजून गावासाठी काही विधायक कार्यक्रम घेण्याचे ठरविले. दरवर्षी सर्वांनी एकत्र येण्याचे निश्चित करून आपल्या मित्र-मैत्रिणींचे सुखदुःख समजून घेऊन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे ठरले.

# गणेशोत्सवानिमित्त बेलगाव येथ विविध कार्यक्रमाचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

बेलगाव तालुका आष्टी जिल्हा बीड येथे सालाबाद प्रमाणे यावर्षी सुद्धा रेणुकाई गणेश मंडळाच्या वतीने गणेशाची स्थापना करण्यात आली.मागील तीस वर्षापासून हे गणेश मंडळ कार्यरत असून यंदाचे ३१ वे वर्षे आहे. यावर्षी मंडळातर्फे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

दिनांक १० सप्टेंबर २०२४ रोजी ह.भ.प.भागचंद महाराज झांजे यांचे सायंकाळी हरिकीर्तन ठेवण्यात आले आहे.१३ सप्टेंबर २०२४ रोजी शालेय विद्यार्थ्यांसाठी रांगोळी स्पर्धा व संगीत खुर्ची स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत.१४ सप्टेंबर २०२४ रोजीपरिसरातील शालेय विद्यार्थ्यांसाठी आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. चालू शैक्षणिक वर्षांमध्ये विविध कलागुणांमध्ये विशेष नैपुण्य मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कारही यावेळी आयोजित करण्यात आला आहे.अशी माहिती गणेश मंडळाचे अध्यक्ष शहाजी पोकळे सर यांनी दिली.

# पाटोदा पोलीस स्टेशन गणेशोत्सव बंदोबस्तासाठी सज्ज-मजहर अली सय्यद

## पंधरा गावात एक गाव एक गणपती स्थापन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा पोलीस स्टेशन गणेशोत्सव बंदोबस्तासाठी सज्ज असून सर्वत्र चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. अशी माहिती पाटोदा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मजहर अली सय्यद यांनी दिली. पाटोदा पोलीस स्टेशन अंतर्गत एकूण ३२ गणेश मंडळाची स्थापना झालेली असुन या पैकी पाटोदा शहरांमध्ये १३ गणेश मंडळाची तर ग्रामीण भागात १९ गणेश मंडळाची स्थापना झालेली आहे. व एक गाव एक गणपतीची पंधरा ठिकाणी स्थापन करण्यात आलेले आहेत. पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व गणेश मंडळांना पाटोदा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री मजहर अली सय्यद हे स्वतः भेटी देत आहेत. गणेश उत्सव शांततेत व आनंदात साजरा व्हावे गणेश मंडळांना व पाटोदा शहरातील जनतेला गणेशोत्सव





मिरवणुकीचा आनंद सुरक्षितरित्या घेता यावा या करीता पाटोदा पोलीस स्टेशन तर्फे योग्य बंदोबस्ताचे नियोजन करण्यात आलेले असून पोलीस स्टेशन पाटोदा येथील व बाहेरील पोलीस बंदोबस्त लावण्यात येणार आहे. असे पोलीस निरीक्षक मजहर अली सय्यद यांनी सांगितले. तसेच पाटोदा पोलीस स्टेशन तर्फे सर्व गणेश मंडळे आणि जनतेस गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या...

# भारतीय जवान किसान पार्टीचा मराठवाडा ओला दुष्काळग्रस्त पाहणी दौरा

## शेतकरी व सैनिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे-प्रदेशाध्यक्ष अंकुश खोटे







> ९ सप्टेंबर पासून स्वराज्य पक्षाचे अध्यक्ष छत्रपती संभाजी राजे भोसले,प्रहार पक्षाचे अध्यक्ष आमदार बच्चू कडू,रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष राजरत्न आंबेडकर,स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष खासदार राजू शेट्टी,भारतीय जवान किसान पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष माननीय नारायण अंकुशे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये या दौऱ्याचे आयोजन...!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

मराठवाड्यामध्ये गेल्या काही दिवसात पावसाने थैमान घातल्याने काढणीस आलेली खरिपाची पिके पाण्याखाली गेल्याने बळीराजाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. सरकार शेतकऱ्यांना धीर देत नसल्याने शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी करून धीर देण्यासाठी भारतीय जवान किसान पार्टीचा मराठवाडा ओला दुष्काळ पाहणी दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये शेतकरी आणि सैनिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आव्हान भारतीय जवान किसान पार्टीचे महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष माजी सैनिक अंकुश दादा खोटे यांनी दि. ७ रोजी माध्यमांशी बोलताना केले आहे. गेल्या काही दिवसापासून मराठवाडा अतिवृष्टी पावसाने झोडपल्याने शेतकऱ्यांची पिके पाण्याखाली गेली आहेत त्यामुळे काढणीस आलेली पिके हातची गेल्याने शेतकरी उध्वस्त झाला आहे.त्या शेतकऱ्यांना धीर देण्यासाठी या दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

दुष्काळामुळे मराठवाड्यामध्ये वर्षानुवर्षे भीषण पाणी टंचाई निर्माण होत असते पण या भागात सध्या ओला दुष्काळ पडला असल्याने शेतकरी परत एकदा हातबल झाला आहे याची पाहणी करण्याकरता परभणी येथून दिनांक ९ पासून स्वराज्य पक्षाचे अध्यक्ष छत्रपती संभाजी राजे भोसले,प्रहार पक्षाचे अध्यक्ष आमदार बच्चू कडू,रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष राजरत्न आंबेडकर,स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष खासदार राजू शेट्टी,भारतीय जवान किसान पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष माननीय नारायण अंकुशे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये या दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती भारतीय जवान किसान पार्टीचे महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष माजी सैनिक अंकुश खोटे यांनी दिली आहे.

हा दौरा पुढीलप्रमाणे असणार आहे.स.०८:३० : उंचाडा, ता. हदगाव स. ०९:०० : मारलेगाव स. ०९:३० : धानोरा स.१०:०० : स्वराज्य जनसंपर्क कार्यालय, हदगाव येथे नांदेड भागासाठी पत्रकार परिषद सर्व नेत्यांचा एकत्रित पाहणी दौरा परभणी

दु. १२:०० : परभणी विश्रामगृह

दु. ०१:०० : मौजे वझुर या गावी नुकसान पाहणी शेतकऱ्यांशी संवाद व परभणी कडे रवाना

दु: ०४ : परभणी विश्रामगृह येथे पत्रकार परिषद होणार आहे.

# आ.बबनराव पाचपुते वाढदिवसानिमित्त उद्या काष्टी येथे श्रीगोंदा नगर तालुक्यातील कार्यकर्त्यांशी संवाद साधणार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

श्रीगोंदा तालुक्याचे आमदार बबनराव पाचपुते यांचा दि. ९ सप्टेंबर रोजी होणारा वाढदिवस हा साधेपणाने साजरा होणार असून वाढदिवसाच्या दिवशी आमदार पाचपुते हे श्रीगोंदा नगर तालुक्यातील कार्यकर्त्यांशी हितगुज करणार असल्याची माहिती भाजप युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमसिंह पाचपुते यांनी आज श्रीगोंद्यात माऊली निवासस्थानी घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली यावेळी त्यांच्यासमवेत भाजप तालुकाध्यक्ष संदीप नागवडे सर, जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र उकांडे हे उपस्थित होते.यावेळी विक्रमसिंह पाचपुते यांनी विधानसभा उमेदवारीबाबत थेट बोलणे टाळत पाचपुते कुटुंबातील उमेदवार कार्यकर्ते व मतदार ठरवतील असे त्यांनी सांगितले

यावेळी माहिती देताना विक्रम पाचपुते म्हणाले की,वाढदिवसाच्या दिवशी काष्टी येथे भाजप डॉक्टर असोशीयेशन च्या वतीने गरजू रुग्णांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीर आणि मोफत औषधे वाटप हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे

कार्यकर्त्यांशी हितगुज साधता यावे त्यांच्याशी चर्चा व्हावी या उद्देशाने त्या दिवशी दिवसभर काष्टी निवासस्थानी आ पाचपुते हे कार्यकर्त्यांसाठी उपलब्ध असणार आहेत

यावेळी श्रीगोंदा तालुक्यात केलेल्या विकासकामां बाबत पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना विक्रमसिंह यांनी सांगितले की श्रीगोंदा शहरातील मुस्लिम बांधवांच्या इदगाह मैदान,डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक थीम पार्क,ओपन जिम अश्या विविध योजनांसाठी नुकताच दहा कोटी रुपये निधी मंजूर झाला आहे श्रीगोंदा नगर तालुक्यातील जवळपास ६५०किमी जिल्हामार्गांचे राज्य मार्गत रूपांतर केले आहे ग्रामीण मार्गांचे प्रमुख जिल्हामार्गात रूपांतर केले आहे तालुक्यात पूर्व पश्चिम रस्ते जोडले असून बेलवंडी फाटा(नगर-पुणे रोड)ते श्रीगोंदा, श्रीगोंदा ते कोळगाव(वडाळी,सुरोडी मार्गे), श्रीगोंदा मांडवगण या रस्त्याचे काँक्रिटीकरण होणार असून आठ ते दहा दिवसात त्याची वर्क ऑर्डर होणार असल्याची माहिती पाचपुते यांनी यावेळी दिली



**रस्त्यांसह देवस्थानांना सुद्धा निधी**

श्रीगोंदा नगर तालुक्यातील रस्त्यासह आगडगाव देवस्थान,कौठा येथील काळाराम राम मंदिर, शहरातील शनी मारुती मंदिर या देवस्थानाचा क वर्गात समावेश करण्यासह विशेष निधी मंजूर केल्याचे पाचपुते यांनी सांगितले

**कुकडी,घोड अस्तरीकरणासाठी निधी मंजूर**

कुकडीचे पाणी सर्वांना मिळत नाही याचे कारण तालुक्यातील कालव्यांची असलेली नादुरुस्ती हे असून कुकडी कालव्याच्या अस्तरीकरणासाठी ८६कोटी रुपये तर घोड च्या अस्तरीकरणासाठी ६३कोटी रुपये निधी मंजूर झाल्याचे यावेळी त्यांनी सांगितले

**श्रीगोंदा शहरासह तालुक्याचा वीज प्रश्न सुटणार**

श्रीगोंदा शहरात १०कोटी रुपयांचे १०००सौरदिवे आणले असून त्यातील ४००दिवे बसवण्यात आले आहेत तसेच विजेची ३३केव्हीची मेन लाईन दुरुस्तीचे काम लवकरच होणार असून त्यानंतर श्रीगोंदा तालुक्यासह शहरातील विजप्रश्न मार्गी लागणार आहे

**त्या जागेवर पुढील दीड वर्ष्यात एमआयडीसी उभी राहील**

पालकमंत्री ना राधाकृष्ण विखे आणि माजी खासदार डॉ सुजय विखे यांच्या विशेष प्रयत्नातून बेलवंडी येथील कृषी महामंडळाची जागा एमआयडीसीच्या पहिल्या टप्प्यासाठी मंजूर झाली असून पहिल्या फेजसाठी जागा हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण झाली आहे येत्या दीड वर्ष्यात सर्व प्रक्रिया पूर्ण होऊन त्या ठिकाणी एमआयडीसी उभी राहील असे पाचपुते यांनी सांगितले

**पोलीस आणि महसूल च्या अधिकाऱ्यांची आमदारांच्या उपस्थितीत बैठक घेऊ**

श्रीगोंदा पोलीस स्टेशनचे नव्याने रुजु झालेले पोलीस निरीक्षक आणि तहसीलदार यांच्या कामकाजाबाबत लोकांमध्ये नाराजगी असल्याचे सांगितल्यावर लवकरच आमदार बबनराव पाचपुते यांच्या उपस्थितीत या अधिकाऱ्यांसह लोकांची बैठक आयोजित करू असे विक्रम पाचपुते यांनी सांगितले तसेच जनतेच्या नगरपरिषदेच्या तक्रारीबाबत मुख्याधिकाऱ्यांच्या उलस्थितीत घेतलेल्या बैठकीला चांगला प्रतिसाद मिळून लोकांचे प्रश्न मार्गी लागल्याचे पाचपुते यांनी सांगितले.

# शिवसेना नेते खासदार श्री.संजय राऊत यांचा नांदेड जिल्हा दौरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**



गुरुवार दिनांक १२ सप्टेंबर २०२४ सकाळी ९.३० नांदेड विमानतळ येथे आगमन. सकाळी १० वाजता शासकीय विश्रामगृह,नांदेड. सकाळी ११ वाजता लोहा येथे आगमन सकाळी ११.१५ लोहा येथील शिवसेना कार्यालय उदघाटन. सकाळी ११.३० लोहा कंधार विधानसभा मतदार संघातील शिवसैनिकांचा मेळावा. १.३० वाजता सोलापूरकडे प्रयाण सायंकाळी ५ वाजता सोलापूर येथे आगमन सोबत श्री.बबनराव थोरात. संपर्कप्रमुख नांदेड हिंगोली जिल्हा. मोबाईल नंबर ९३२२२३८४८८

# आष्टीत मराठा आरक्षण जनजागृतीसाठी मोटरसायकल रथ यात्रा

## १३ तारखेला पिंपळवंडी येथे होणाऱ्या घोंगडी बैठकीस उपस्थित राहण्याचे अवाहन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

आष्टी तालुक्यातील शेरी बु येथील मराठा युवकांनी आपले राजकीय पक्षाचे जोडे बाजूला ठेवून मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली समाजाने एकत्र येऊन मराठा आरक्षण मिळवण्यासाठी घोंगडी बैठका सुरु केल्या आहेत यासाठी आष्टी तालुक्यातील शेरी बु येथील दिपक सोनवणे, कांतीलाल गिरहे यांच्या मार्गदर्शनाखाली नामदेव सोनवणे, यादव सोनवणे, अजिनाथ सोनवणे, सचिन सोनवणे,गणेश पवार, दिग्विजय (मुन्ना)महाडिक आदी सकल मराठा समाजाच्या वतीने आष्टी तालुक्यात मोटरसायकल रथ यात्रा काढून मराठा समाजाला सरसकट आरक्षण मिळावे यासाठी पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथे होणाऱ्या १३ तारखेला मराठा समाजाने आपल्या न्याय हक्कासाठी उपस्थित राहून मनोज दादा जरांगे पाटील यांनी आयोजित केलेल्या घोंगडी बैठकीस उपस्थित राहावे असे अवाहन करण्यात येत आहे

याविषयी माहिती अशी की, महाराष्ट्रात मराठा समाजाला सरसकट आरक्षण न दिल्यास आगामी विधानसभा निवडणुकीसाठी काय करायचे यासाठी रणनिती आखण्यासाठी यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी महाराष्ट्रातील संपूर्ण मराठ्यांची एकजूट करून सरकारला सगेसोयऱ्यांच्या अंमलबजावणी जाग करण्यासाठी घोंगडी बैठकीचे निर्णय घेतला असून १३ तारखेला पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथे होणाऱ्या घोंगडी बैठकीसाठी आष्टी तालुक्यातील मराठा युवकांनी अनोखी शक्कल लढवली त्यानी आपल्या स्वतःच्या मोटरसायकलला रथ बनवून मराठा आरक्षण जनजागृती करण्यासाठी संपूर्ण तालुक्यात निमंत्रण देत आहेत यासाठी मोटरसायकला विशिष्ट पद्धतीने साचा बसवून रथ बनविला त्यावर मराठा योद्धा मनोज दादा जरांगे यांचे बॅनर लावून रथ यात्रेच्या माध्यमातून घोंगडी बैठकीस आमंत्रित करण्यात येत आहे.



# नॅशनल पंच म्हणून टाकळी हाजी येथील शेख शौकत मुजावर यांची निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती । प्रतिनिधी**

राज्य पातळीवर तसेच शासन दरबारी जित कुने दो या स्वसंरक्षण खेळ ग्रामीण भागातील खेळाडूना क्रिडा विभागाच्या खेळामध्ये समावेश आसल्याने ग्रेस गुण मिळावे तसेच राज्य पातळीवर प्रशिक्षित पंच घडावे म्हणून महाराष्ट्र जित कुने दो असोशिएशन खेळाचे महाराष्ट्र अध्यक्ष प्रमोदजी फुलसुंदर यांनी नॅशनल पंच परिक्षेचे आयोजन शिक्रापुर तालुका शिरुर ज़िल्हा पुणे येथे केले होते.

यामध्ये महाराष्ट्रातील निवडक पंचानी सहभाग नोदवला होता. यामध्ये टाकळी हाजी ता. शिरूर चे अनुभवी प्रशिक्षक शेख शौकत मुजावर यांची नॅशनल पंच पदी नियुक्ती करण्यात आली .



या प्रसंगी शेख शौकत मुजावर म्हणाले की पुणे ग्रामीण भागातील खेळाडूना ग्रेस गुण मिळावे तसेच त्यांच्यात स्वसंरक्षण खेळाची गोडी लागावी म्हणून प्रमोदजी फुलसुंदर यांचे मार्गदर्शन घेत वरिष्ठाच्या सुचनेनुसार वाटचाल करीन . पंच परिक्षेचे मार्गदर्शन आंतर राष्ट्रीय पंच डॉ.एम.सिंग,सेक्ट्रेटरी जे.के. डी.सिफु लाईन विकास गिहरा यांनी केले,राज्यातुन निवडक प्रशिक्षकांच्या उपस्थितीत निवड प्रक्रिया संपन्न झाली. द युवा ग्रामीण पत्रकार संघ महाराष्ट्र सहसचिव व शिरुर तालुक़ा ग्रंथालय संघ अध्यक्ष विवेकानंद फंड,पत्रकार शकील मणियार,मा.बापुसाहेब गावडे विद्यालय प्रा. आर.बी.गावडे सर, आदर्श विद्यालय वरुडे प्रा. एन.बी.चौधरी, जि.प.प्राथ.शाळा वाघाळे केंद्रप्रमुख यशवंत रणदिवे सर, जि.प.प्राथ.शाळा खैरेनगर मुख्यध्यापिका शिंदे मॅडम, श्री. डी.एन ताठे विद्यालय कारेगाव प्रा.झावरे मॅडम, जि.प.प्राथ शाळा ढोकसांगवी टिकेकर मॅडम सह डी.एस.पवार सर, मा.बापुसाहेब गावडे विद्यालय म्हसे, चांडोह विद्यालय प्रा.विलास घोडे,गाडीलकर सर शिक्षक वृंद,पत्रकार बांधव, पोलीस अधिकारी,कर्मचारी, ग्रामसेवक,पोलीस पाटील संघटनेचे सुदर्शन भाकरे, ज्ञानप्रबोधिनी कोचिंग क्लासेस प्रविण भाकरे, पर्ल कोचिंग क्लासेस टाकळी हाजी बेल्हेकर सर यांनी शुभेच्छा देत निवडीबाबत कौतुक केले.

# शासकीय योजनेवर काम करणाऱ्या युवक व युवतींना सहा महिन्यांनंतर सेवेत कायम करण्याची मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

मुख्यमंत्री कार्य प्रशिक्षण या शासकीय योजनेत काम करणाऱ्या युवक आणि युवतींना सहा महिन्यानंतर सेवेत कायम करण्याची शासनाकडे सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ.हनुमंत भोपाळे यांनी मागणी केली आहे.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना मुख्यमंत्री योजना दूत उपक्रम , मुख्यमंत्री माझा लाडका भाऊ आदी योजनेमध्ये काम करत असलेल्या युवक युवतींना वाऱ्यावर सोडू नये त्यांना सहा महिन्यांनंतर रोजगार ,स्वयंरोजगार किंवा नोकरी उपलब्ध करून द्यावी.अशी आग्रही मागणी डॉ हनुमंत भोपाळे यांनी शासनाकडे मागणी केलीआहे.या मागणीला



पाठिंबा देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यातून संघटन उभे केले जाणार आहे.प्रत्येक जिल्ह्यातून युवक आणि युवती यांची समिती स्थापन करणार आहोत.. ज्यांची इच्छा असेल त्यांनी प्रा.डॉ.हनुमंत मारोतीराव भोपाळे यांच्या कडे संपर्क साधावा असे त्यांनी सर्व युवक व युवतींना आवाहन केले आहे.

# कामळज येथे श्रीचक्रधर स्वामी व श्रीगोविंद प्रभू जन्मोत्सवा निमित्त भागवत कथेचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

महानुभाव पंथाचे संस्थापक परब्रम्ह परमेश्वर अवतार, जीवोद्धारक सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी यांनी १२ व्या शतकात अवतार धारण करून महानुभाव पंथाची स्थापना केली समाजातील अनिष्ट,रूढी, प्रथा-परंपरा विरुद्ध, सामाज सुधारणा करून स्त्री पुरुष समानते चा मुलमंत्र देणाऱ्या सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी यांची जयंती व स्वच्छतेचा मूलमंत्र देणारे अवलिया परमेश्वर अवतार श्री गोविंद प्रभू अवतार दिन दि १६ सप्टेंबर २०२४ रोज सोमवार कामळज ता मुदखेड येथे मोठया उत्साहाने साजरा करण्यात येणार आहे या महोत्सवाची सुरुवात दि ०९/०९/२०२४ सोमवार रोजी प्रातःकाली कुलवंदनास मंगलस्नान , गीतापाठ पारायण, ध्वजारोहन, सभामंडप उदघाटन, अतिथी स्थानापन्न, स्वागत , दीपप्रज्वलन, प्रास्ताविक, शुभेच्छापर वक्तव्य, भागवत कथेचा सुभारंभ प. पू. प.म श्री कथाव्यास संकेतमुनी बाबाजी महानुभाव मठाधिपती (आचार्य गोपीराज महानुभाव संस्थान शेळावे ता पारोळा जि जळगाव ) यांची सुश्राव्य संगीत भागवत कथा दररोज ३ ते ५ या वेळेत भागवत कथेचा सप्ताह व रात्री ९ ते ११ या वेळेत


प पु प म श्री रमेशराज शास्त्री पातुरकर अहमदाबाद जि पुणे

प पु प म श्री रमेशराज शास्त्री कपाटे बिजेगाव जि नांदेड

प पु प म श्री गिरीशराज शास्त्री उरळीकांचन जि पुणे

प पु प म श्री ऋषिराज बाबा शिंदेगाव जि नाशिक

तपस्विनी शितलबाई भोजने बरड शेवाळा ता हदगाव



प पु प म श्री जयेशमुनी मराठे गंगापूर जि नाशिक

प म श्री संकेत बाबाजी शेवाळे ता पारोळा जि जळगाव यांची कीर्तन सेवा आयोजित केली आहे दिनांक १५सप्टेंबर २०२४ दुपारी ३ वाजता कुलवंदनाची रथयात्रा आचार्य संत महंताची भव्य शोभा यात्रा संगीत सेवा रोकडेश्वर भजनी मंडळ माळकौठा व दिनांक १६ सप्टेंबर प्रातःकाळी ५ वाजता कुलवंदनास सुगंध चंदन आधी मंगल स्नान ,८ ते ११:३० संत महिला गीतापाठ पारायण , ध्वजारोहण , सभामंडप उद्घाटन अतिथी अध्यक्ष स्थानापन्न स्वागत दीप प्रज्वलन प्रास्ताविक धर्मसभा प्रबोधन प्रमुख अतिथी प पु प म श्री पारीमांडले कुलभूषण आचार्य श्री मानेकर बाबाजी शास्त्री श्री दत्त मंदिर संस्थान सावदा जि जळगाव,प पु प म श्री उपाध्य कुलभूषण आचार्य श्री जावळे बाबाजी शास्त्री श्री कृष्ण ज्ञान मंदिर सावदा जि जळगाव यांच्या प्रमुख उपस्थित आणि प पू प म श्री खरवळकर बाबाजी जामोदेकर सिंधी ता उमरी जि नांदेड,प पु प म श्री हरबास बाबाजी शास्त्री कारंजेकर बिल्लाळी, ता मुखेड जि नांदेड,प पु प म श्री महंत गोमेराज बाबाजी कारंजेकर म्हसावद ता शहादा जि नंदुरबार,प पू प म श्री शहागडकर बाबाजी पैठणकर निवघाबाजार ता. हादगाव जि नांदेड यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड जिल्हा समस्त संत महंत भिक्षुक वासनिक तपस्वीनी व पंथीय पंथीयत्तर बंधू भगिनी उपस्थित राहणार आहेत तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन महंत श्री अनंतव्यास बाबाजी जावळे संचालक श्री दत्त मंदिर कामळज हे करणार आहेत तरी परिसरातील सर्व धर्मप्रेमींनी उपस्थित राहून धर्मज्ञानाचा भागवत कथा, नामांकित किर्तनकाराच्या किर्तनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक समस्त गावकरी मंडळ कामळज (बु) ता .मुदखेड जि .नांदेड येथील गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904